# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१९

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

**पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील रुग्णालयात आरोग्य सोयी-सुविधांचा अभाव असल्याबाबत**

**(१) ४२२०१ (१०-०५-२०१६) श्री.भारत भालके (पंढरपूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील रुग्णालयात रुग्णसाठी कोट्यावधी रुपयाचा खर्च करुन उभारण्यात आलेल्या शासकीय यंत्रणेकडून समाधानकारक आरोग्य सुविधा मिळत नसल्याच्या तक्रारी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अदयाप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (१९-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही

(२) पंढरपूर जि.सोलापूर तालुक्यात खालीलप्रमाणे आरोग्य संस्था कार्यान्वित आहेत.

| अ.क्र. | आरोग्य संस्था | संख्या | संस्थेचे नांव |
|---|---|---|---|
| १ | उपजिल्हा रुग्णालय | १ | पंढरपूर |
| २ | ग्रामीण रुग्णालय | १ | करकंब |
| ३ | प्राथमिक आरोग्य केंद्र | ८ | १) गादेगाव २) उंबरे पागे ३) रोपळे ४) कासेगाव ५) पुळूज ६) भाळवणी ७) खर्डी ८) तुंगत |
| ४ | उपकेंद्रे | ४२ | |
| | आयुर्वेदिक दवाखाना | १ | शेळवे<br>-------------------- |
| | एकूण संस्था | ५३ | |

पंढरपुर येथे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय पंढरपूर कार्यन्वित असुन सदर रुग्णालयात विविध विशेषज्ञ विभाग कार्यरत आहेत. या रुग्णालयात रुग्णांना तात्काळ सुविधा मिळावी या करीता २४ तास तात्काळ सेवा देणारा कक्ष/विभाग सुध्दा कार्यन्वित आहे. सदर सुविधेचा लाभ प्रत्यक्ष पणे रुग्ण घेत आहेत. तसेच पंढरपूर तालुक्यात मौजे करकंब येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय कार्यान्वित असून या ही ठिकाणी रुग्णांना आवश्यक त्या सोयी सुविधा पुरविल्या जात आहेत.

पंढरपूर तालुक्यात व शहरात वर्षभरातील चारही वारी यात्रांचे नियोजन योग्य पध्दतीने केले. त्यामुळे कोणताही उद्रेक अथवा अघटीत घटना घडली नाही.
(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**राज्यभरातील रूग्णांना पुरेशा प्रमाणात औषधोपचार मिळत नसल्याबाबत**

**(२) ४८४६५ (११-०५-२०१६) श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागात डॉक्टरांसह ३० टक्के पदे रिक्त असल्याने राज्यभरातील रूग्णांना पुरेशा प्रमाणात औषधोपचार मिळत नसल्याची बाब माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार राज्यभरातील रूग्णालयातील डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांची पदे पुर्ण क्षमतेने भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (१४-१२-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.
राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागात वैद्यकीय अधिकाऱ्यांसह २७ टक्के पदे रिक्त आहेत. तथापि राज्यभरातील रुग्णांना पुरेशा प्रमाणात औषधोपचार मिळत नसल्याचे बाब खरी नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे-५४००) संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीस अधिकार देण्यात आलेले आहे. जिल्हाधिकारी यांच्यास्तरावरुन तसेच शासन स्तरावरुन स्वतंत्र निवड मंडळामार्फत वैद्यकीय अधिकारी गट-अ (पे बॅन्ड १५६००-३९१००+ ग्रेड पे ५४००) या संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हयात वैदयकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(३) ५४३६० (३०-०८-२०१६) श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयात वैदयकीय अधिकाऱ्यांची ३७ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयातील कोणत्या आरोग्य केंद्रांमध्ये वैदयकीय अधिकाऱ्यांची पद रिक्त आहेत,

(३) असल्यास, पावसाळयात सर्पदंश, विंचूदंश आणि साथीचे आजार अशावेळी रूग्णांना अत्यावश्यक सेवा उपलब्ध करून देण्यासाठी सदर आरोग्य केंद्रांमध्ये शासनाने कोणती पर्यायी व्यवस्था केली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची त्याची कारणे काय?

**डॉ. दीपक सावंत (१४-१२-२०१८) :** (१) रत्नागिरी जिल्हयात १ जिल्हा रुग्णालय, ३ उपजिल्हा रुग्णालय, ८ ग्रामीण रुग्णालय, ६७ प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यान्वित आहेत. सदर आरोग्य संस्थांमध्ये वैद्यकीय अधिकारी, गट-अ, ग्रेड पे रु. ६६००/- संवर्गाची एकूण ३० पदे मंजूर असुन, ७ पदे भरलेली व २३ पदे रिक्त आहेत. तसेच वैद्यकीय अधिकारी, गट-अ, ग्रेड पे रु. ५४००/- संवर्गाची एकूण २२५ पदे मंजूर असून १९५ पदे भरलेली व ३० पदे रिक्त आहेत.

(२) १० प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये वैद्यकीय संवर्गाचे १ पद रिक्त आहे. (१) प्रा.आ. कें. पणदेरी ता. मंडणगड (२) प्रा.आ. कें. केळशी ता. दापोली (३) प्रा.आ. कें. लोटे ता. खेड (४) प्रा.आ. कें. तळवली ता.गुहागर (५) प्रा.आ. कें. निवे खुर्द ता. संगमेश्वर (६) प्रा.आ. कें. फणगुस ता. संगमेश्वर (७) प्रा.आ. कें.धामापूर ता.संगमेश्वर (८) प्रा.आ. कें. हातखंबा ता. रत्नागिरी (९) प्रा.आ.कें. वाडीलिंबू ता.लांजा (१०) प्रा.आ. कें. सोलगांव ता. राजापूर

उक्त सर्व प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी अत्यावश्यक सेवा देणेकरिता किमान १ वैद्यकीय अधिकारी कार्यरत ठेवण्याची दक्षता घेण्यात आली आहे.

(३) पर्यायी व्यवस्था म्हणून रत्नागिरी जिल्ह्यातील ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालयांपकी काही संस्थांमध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यक्रमांतर्गत आयुष, आरबीएसके अंतर्गत वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. त्यांचेमार्फत सर्पदंश, विंचूदंश व साथीचे आजाराच्या रुग्णांना आवश्यक आरोग्य सेवा उपलब्ध करुन दिली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दौंड (जि.पुणे) येथील ग्रामीण रुग्णालयाचे बांधकाम अपुरे पडत असल्याने रुग्णसेवांवर विपरीत परिणाम होत असल्याबाबत**

**(४) ६०५१३ (३०-०८-२०१६) श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि. पुणे) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयाची इमारत अपुरी पडत असल्याने रुग्णाची गैरसोय होत असल्यामुळे सदर इमारतीचा विस्तार अथवा नवीन बांधकाम करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा. आरोग्य मंत्री यांना दिनांक २४ मे २०१६ रोजी वा त्यासुमारास

निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दौंड तालुक्यातील आरोग्य विषयक विविध मागण्याबाबत दिनांक १४ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.आरोग्य मंत्री यांच्या नागपूर निवासस्थानी बैठक घेण्यात आली होती हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बैठकीत झालेल्या चर्चेनुसार घेण्यात आलेलेल्या निर्णयानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच दौंड (जि.पुणे) येथील ग्रामीण रुग्णालयाच्या इमारतीचा विस्तार अथवा नवीन बांधकाम करण्यासाठीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (१९-१२-२०१८) :** (१) व (२) खरे आहे.
(३) व (४) उपजिल्हा रुग्णालय दौंड या रुग्णालयाचे ५० खाटावरुन १०० खाटामध्ये श्रेणीवर्धन करण्यास दि.१२/१०/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानूसार नविन बांधकामाचे अंदाज पत्रक व आराखडे तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

### नांदेड जिल्ह्यातील वैद्यकीय अधिकाऱ्यांना नियमबाह्य नियुक्त्या देण्यात आल्याबाबत

**(५) ६२८३७ (३०-०८-२०१६). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यातील ९ वैद्यकीय अधिकाऱ्यांना तालुका आरोग्य अधिकारी पदावर नियमबाह्य नियुक्त्या देण्यात आल्याचा प्रकार माहे एप्रिल, २०१६ मध्ये निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाअंतर्गत कार्यरत असलेल्या १० वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या बदल्या तसेच एकूण ३३ आरोग्य कर्मचाऱ्यांच्या प्रतिनियुक्त्या यापूर्वी नियमबाह्य करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणासंदर्भात शासनाने चौकशी केली आली आहे काय,
(४) असल्यास, नियमबाह्य नियुक्त्या करण्याची कारणे काय,
(५) असल्यास, दोषी असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१४-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.
सन २०१३ च्या पुर्वीचे कालावधीत एकुण १० वैद्यकीय अधिकारी यांच्या जिल्हा अंतर्गत बदल्या हया तत्कालीन परिस्थितीनुसार केल्याचे दिसुन येते. तसेच यापुर्वीचे कालावधीत १६

वैद्यकीय अधिकारी व ३३ कर्मचारी यांच्या केलेल्या अनावश्यक प्रतिनियुक्त्या ऑगस्ट २०१४ मध्ये रद्द करण्यात आल्या.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अतिदुर्गम आदिवासी भागात कार्यरत असलेल्या डॉक्टरांना कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्याबाबत**

**(६) ६५६९४ (२७-०१-२०१७). अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नंदुरबार, अमरावती, जव्हारसह अतिदुर्गम आदिवासी भागात तसेच नक्षलग्रस्त गडचिरोलीतील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये जवळपास एक तप रुग्णसेवा करणाऱ्या आरोग्य विभागातील डॉक्टरांना अजूनही हंगामी म्हणूनच काम करावे लागत असल्याचे माहे ऑक्टोबर २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सन २००३ मध्ये सदर बीएमएस डॉक्टरांना हंगामी सेवेत सामावून घेतले असून अकरा वर्ष उलटूनही सदर डॉक्टरांना सेवेत कायम न केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, या डॉक्टरांना दर अकरा महिन्यांनी शासनाकडून सेवेत काम करण्यासाठी आदेश घ्यावे लागत असून हे आदेश मिळविण्याकरिता संबधित वरिष्ठांना पैसे दिल्याशिवाय आदेश मिळत नसल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (२०-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.
सदर बी.ए.एम.एस. डॉक्टरांची नेमणूक हंगामी स्वरुपाची नसून अस्थायी स्वरुपाची आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

वि.स. ५३९ (६)

**कोल्हापूर जिल्हयातील आरोग्य विभागात कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(७) ६८६८१ (१०-०१-२०१७). श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील आरोग्य विभागात स्त्रीरोग तज्ञ, भूलतज्ञ, हृदयविकार तज्ञ आणि कर्मचाऱ्यांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांची कारणे काय आहेत,

(३) तसेच, कोल्हापूर जिल्हयात स्त्रीरोग तज्ञ, भूलतज्ञ, हृदयविकार तज्ञ आणि कर्मचाऱ्यांची रिक्त असलेली पदे भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच कोल्हापूर येथील सीपीआर रूग्णालयाला लिफ्टची सोय करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२०-१२-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

कोल्हापूर जिल्हयात आरोग्य विभागात उपजिल्हा रुग्णालयामध्ये व ग्रामीण रुग्णालयामध्ये स्त्रीरोगतज्ञांची २० पदे मंजूर असून त्यापैकी १४ पदे भरलली आहेत. तसेच भूलतज्ञांची २१ पदे मंजूर असून त्यापैकी ११ पदे भरलेली आहेत. तसेच हृदयविकारतज्ञांचे पद मंजूर नाही.

(२) सेवानिवृत्ती, स्वेच्छासेवानिवृत्ती, राजीनामा तसेच पात्र उमेदवार उपलब्ध न होणे, इत्यादी कारणामुळे पदे रिक्त आहे.

(३) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (ग्रेड पे रु. ६६००) मधील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु असून, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ वैद्यकीय अधिकारी (ग्रेड पे रु. ५४००) यांची रिक्त पदे भरण्यासाठी शासन निर्णय दि. २६/१०/२०१६ अन्वये जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीमार्फत नियमित वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे मुलाखतीद्वारे भरण्यास परवानगी देण्यात आली होती. त्यानुसार १४ आत्महत्याग्रस्त जिल्हयांसाठी ४१२ व उर्वरित २२ जिल्हयांसाठी २८८ वैद्यकीय अधिकारी गट-अ ची रिक्त पदांची जाहिरात देण्यात आलेली होती. त्यानुसार एकूण ७०० पदांपैकी ३०६ पदे जिल्हास्तरावर भरण्यात आली असून उर्वरित ३९४ रिक्त पदे भरण्याबाबत तशी जाहिरात ०८ सप्टेंबर, २०१७ रोजी शासन स्तरावरून देण्यात आली असून, त्याबाबतची प्रक्रिया सुरु आहे. तसेच गट-क संवर्गातील कोल्हापूर परिमंडळ स्तरावर रिक्त पदे भरण्यासाठी माहे डिसेंबर, २०१६ मध्ये जाहिरात देण्यात आली असून लेखी परीक्षा घेण्याची कार्यवाही सुरु आहे. गट-ड संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी माहे जानेवारी, २०१७ मध्ये लेखी परिक्षा घेण्यात आली असून, सदर पदे भरण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

(४) कोल्हापूर येथील सीपीआर रुग्णालयात ४ लिफ्ट उपलब्ध असून त्या सुस्थितीत चालू आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्हयातील सर्व तालुक्यात वैद्यकीय अधिक्षकाची व वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत

**(८) ७०९३७ (१०-०१-२०१७). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील सर्व तालुक्यात वैद्यकीय अधिक्षकाची १५ व वैद्यकीय अधिकाऱ्यांची १९ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रिक्त पदे त्वरीत भरण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, याबाबत कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०२-१२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

वैद्यकीय अधिक्षकांची १६ पदे रिक्त आहेत व वैद्यकीय अधिकाऱ्यांची एकूण १४१ पदे भरली असून २४ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा,गट-अ (ग्रेड पे रु.६६००) मधील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा,गट-अ (ग्रेड पे रु.५४००) मधील रिक्त पदे भरण्यासाठी शासनाने शासन निर्णय दि.२४ जून, २०१६ अन्वये जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरावर समिती नेमण्यात आली आहे. समितीमार्फत ८ पदे भरण्यात आली आहेत. उर्वरित पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यात शासनाच्या विविध योजना गरीब आदिवासींपर्यंत पोहचत नसल्याबाबत

**(९) ७१५२४ (१०-०१-२०१७). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यात कुपोषण व बालमृत्यूमुळे शासनाच्या विविध योजना गरीब आदिवासींपर्यंत पोहचत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू योजना राबविताना आरोग्य विभाग व महिला बालकल्याण विभाग व आदिवासी विभाग या विभागांच्या अंतर्गत योग्य तो समन्वय नसल्यामुळे आदिवासींना योजनांचे फायदे योग्य वेळी मिळत नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१४-१५ व सन २०१५-१६ मध्ये एकूण किती बालकांची तपासणी आरोग्य अधिकाऱ्यांनी केली व त्यापैकी किती बालके कमी वजनाची आढळून आली तसेच किती बालके तिव्र कमी वजनाची आढळली,

(४) असल्यास, अंगणवाडी सेविकांना पुरेसे वेतन दिले जात नसल्याने व आदिवासी भागात काम करणाऱ्या बीएचएमएस डॉक्टरांना सेवेत कायम न करता त्यांना वेठबिगारांसारखे राबवून घेत असल्याने त्यांच्यात प्रचंड असंतोष असून त्याचा आरोग्य सेवेवर परिणाम होतो, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त कार्यपध्दतीतील त्रुटी दूर करण्याबाबत तसेच आदिवासी बालकांना योग्य वेळी चांगले व तज्ञ डॉक्टरांकडून औषधोपचार मिळण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) सन २०१४-१५ मध्ये आर.बी.एस.के. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी एकूण १६९१६३ बालकांची तपासणी केली व त्यापैकी ६८९० बालके कमी वजनाची आढळून आली तसेच १६७५ बालके तीव्र कमी वजनाची आढळली व सन २०१५-१६ मध्ये आर.बी.एस.के. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी एकूण १६६५५५ बालकांची तपासणी केली व त्यापैकी ४८६१ बालके कमी वजनाची आढळून आली तसेच १०२८ बालके तीव्र कमी वजनाची आढळली.
(४) अंगणवाडी सेविका यांना मासिक रु.५०००/-व अंगणवाडी मदतनीस यांना मासिक रु.२५००/- इतके मानधन देण्यात येत आहे.
तथापि, पालघर जिल्हा परिषद अंतर्गत ४८ बीएएमएस वैद्यकिय अधिकारी यांना कार्यरत आहेत. तथापि, आरोग्य सेवेवर कोणताही विपरीत परिणाम झालेला नाही.
(५) कुपोषण,बालमृत्यू रोखण्यासाठी खालील उपाययोजना राबविण्यात येत आहेत :-
* अंगणवाडी कार्यकर्ती मार्फत ० ते ६ वयोगटातील सर्व मुलांचे वजन, उंची व दंडघेर यांची नोंद घेऊन सॅम व मॅम श्रेणी निश्चित करुन त्यानुसार कुपोषित मुलांच्या श्रेणीनुसार व आवश्यकतेनुसार बालकांना VCDC, CTC व NRC मध्ये दाखल करण्यात येते.
* जिल्हास्तरावर उपलब्ध नियमित बालरोग तज्ञ तसेच मुंबईतील जसलोक, हिंदुजा, वाडिया, ग्लोबल व सुर्या हॉस्पिटल या खाजगी रुग्णालयातील बालरोग तज्ञ यांचेमार्फत उपजिल्हा रुग्णालय,ग्रामिण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर आरोग्य शिबीरांचे नियोजन करण्यात येवून त्याद्वारे सॅम व मॅम श्रेणीतील तसेच इतर आजारी मुलांची आरोग्य तपासणी करुन आवश्यक उपचार दिले जातात.
* प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर अंगणवाडी सेविका व आरोग्य कर्मचारी यांची दरमहा आढावा सभा घेण्यात येवून आवश्यक उपाययोजना करण्यात येतात.

---

**कडवई (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामधील शवविच्छेदन कक्षाचे दुरावस्थेबाबत**

**(१०) ७२४८२ (२७-०१-२०१७). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कडवई (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामधील शवविच्छेदन कक्षाची अत्यंत दुरवस्था झालेली असल्यामुळे मृत व्यक्तींच्या शवविच्छेदनासाठी त्यांना अन्य ठिकाणी पाठवावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शवविच्छेदन कक्षाच्या दुरावस्थेबरोबर विद्युतीकरणाचा अभाव तसेच कटर उपलब्ध नसल्यामुळे नागरीकांना गैरसोईला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शवविच्छेदन कक्षाचे नुतनीकरण करणे व आवश्यक सुविधा उपलब्ध करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१९-१२-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.
प्राथमिक आरोग्य केंद्र कडवई, ता. संगमेश्वर येथील शवविच्छेदनगृह सुस्थितीत आहे. तथापि प्रशिक्षित कर्मचारी नसल्यामूळे शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालय संगमेश्वर येथे पाठविण्यात येते.
(२) व (३) शवविच्छेदन केंदाचे विद्युतीकरण व नुतनी करण्याचे काम पूर्ण झाले असून उपलब्ध चतूर्थ श्रेणी कर्मचा-यांमधून इच्छूक कर्मचा-यास शवविच्छेदन करण्याचे प्रशिक्षण देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## भंडारा येथील जिल्हा सामान्य रुग्णालय, ग्रामिण रुग्णालय व उपजिल्हा रुग्णालयांतील रिक्त पदे भरणेबाबत

**(११) ७३०२० (१०-०१-२०१७). श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा येथील जिल्हा सामान्य रुग्णालय, ल ग्रामिण रुग्णालय व उपजिल्हा रुग्णालयांमध्ये वैद्यकीय अधिकारी तसेच वर्ग ३ व ४ ची पदे रिक्त असून एक्स-रे व सिटी स्कॅन सारख्या मशीन्स बंद अवस्थेत आहेत, हे खरे आहे काय
(२) असल्यास, बहुतेक रुग्णालयांमध्ये वैद्यकीय अधिकारी नसून, एक्स-रे व सिटी स्कॅन चालविणारे ऑपरेटर उपलब्ध नसल्यामुळे ग्रामिण भागातील आदिवासी गरीब रुग्णांना खाजगी ठिकाणी जावे लागत असल्याचे माहे आक्टोबर २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, शासनाने रिक्त पदे व रुग्णालयातील मशीन्स तातडीने दुरुस्त करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१४-१२-२०१८) :** (१) व २) हे अंशत: खरे आहे.
भंडारा जिल्हयातील आरोग्य संस्था मध्ये वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे-६६००) संवर्गाची एकुण ३१ पदे मंजुर असून ५ पदे भरलेली व २६ पदे रिक्त आहेत. तसेच वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे ५४००) या संवर्गाची एकुण १५४ पदे मंजूर असुन त्यापैकी १२६ पदे भरलेली व २८ पदे रिक्त आहेत. गट-क ची ४८९ पदे मंजुर असून ३२९ पदे भरलेली व १६०

पदे रिक्त आहेत. तसेच गट-ड संवर्गाची ३२० मंजुर असून २०३ पदे भरलेली व ११७ पदे रिक्त आहेत.

सामान्य रूग्णालय भंडारा येथे सिटी स्कॅन मशीन सुरळीतपणे सुरु आहे.
उपजिल्हा रूग्णालय तुमसर व साकोली, ग्रामिण रूग्णालय लाखांदुर व पवनी येथे क्ष-किरण यंत्र कार्यरत आहेत. ग्रामिण रूग्णालय लाखनी येथे क्ष-किरण यंत्र तज्ञ उपलब्ध करुन घेण्याची व क्ष-किरण यंत्र कार्यान्वित करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे ६६००) व ग्रेड पे ५४००) संवर्गाची रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरू आहे. वर्ग-३ व वर्ग-४ संवर्गाची रिक्त पदे भरण्याबाबत क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खालापूर, चौक, वावोशी (जि.रायगड) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील समस्यांबाबत**

**(१२) ७६२४८ (१८-०४-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्हयातील खालापूर, चौक, वावोशी (जि.रायगड) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात अनेक आधुनिक मशिनरी केवळ कुशल तंत्रज्ञ तसेच योग्य देखभाली अभावी विनावापर पडून असून औषधांचा पुरेसा साठाही नसून कर्मचारी व वैद्यकिय अधिका-यांची कमतरता असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे येथील रुग्णांना खाजगी रुग्णालयात उपचार घ्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१९-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

रायगड जिल्हयातील खालापूर, चौक, वावोशी प्राथमिक आरोग्य केंद्रांना मागणीप्रमाणे औषधी व साहित्याचा पुरवठा करण्यात आलेला आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र खालापूर व चौक येथे वैद्यकिय अधिका-यांच्या ०२ मंजूर पदांपैकी दोन्ही पदे भरलेली असून वावोशी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील ०२ पैकी ०१ वैद्यकिय अधिका-यांचे पद भरण्यात आले आहे. उर्वरीत वैद्यकिय अधिका-यांची रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही शासन स्तरावर सूरु आहे. तर अन्य कर्मचा-यांची पदे ग्राम विकास विभागामार्फत भरण्याची कार्यवाही सूरु आहे.
(२) हे खरे नाही
(३), (४) आणि (५) प्रश्न उदभवत नाही.

---

**राज्यात पोलिओच्या इंजेक्टेबल लसीचा तुटवडा निर्माण झाल्याबाबत**

**(१३) ७६५८८ (१८-०४-२०१७). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात लहान मुलांना देण्यात येणाऱ्या पोलिओच्या इंजेक्टेबल लसीचा तुटवडा माहे डिसेंबर २०१६ पासून निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लहान मुलांना पोलिओ होवू नये म्हणून सदर लसीचा पुरवठा लवकरात लवकर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०२-१२-२०१८) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

सदरी लसींचा पुरवठा केंद्र शासनाकडून करण्यात येतो व त्याप्रमाणे डिसेंबर,२०१६ पर्यंत ५,२३,५०० आणि तद्नंतर जून, २०१७ पर्यंत ७,५०,००० I.P.V. (आय.पी.व्ही.) लसींचा पुरवठा झाला आहे. तसेच ओ.पी.व्ही. लसींचा साठा राज्यात पुरेसा उपलब्ध आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देवरूख (जि.रत्नागिरी) येथील ग्रामीण रूग्णालय कर्मचारी वसाहतीची झालेली दुरवस्था**

**(१४) ८५१८८ (११-०८-२०१७). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवरूख (जि.रत्नागिरी) येथील ग्रामीण रूग्णालयाच्या कर्मचारी वसाहतीची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रूग्णालय कर्मचारी भाडयाच्या खोलीत राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कर्मचारी वसाहतीच्या दुरूस्ती वा नूतनीकरणाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१९-१२-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) देवरुख ग्रामीण रुग्णालयाची मुख्य इमारत व कर्मचारी वसाहतीच्या दुरुस्तीसाठी राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यक्रमातंर्गत रु.२५.०० लक्ष इतके अनुदान वितरीत केले असून सदर अनुदानातुन दुरुस्तीची पुढील कार्यवाही करण्यात येत आहे

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**मालेगांव (ता. जि.नाशिक) येथील सामान्य रुग्णालयातील गैरसोयीबाबत**

**(१५) ८८०३३ (१२-०८-२०१७). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (ता,जि.नाशिक) शहरातील सामान्य रुग्णालयांमध्ये तज्ञ डॉक्टर व सोयी सुविधांचा अभाव असल्याने रुग्णांना तेथे वेळीच उपचार मिळत नसल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी नागरिकांची होणारी गैरसोय दूर करण्याबाबत लोकप्रतिनिधीनी मा.आरोग्य मंत्री यांना यापूर्वीच निवेदन दिले असून याबाबत अदयापही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०२-१२-२०१८) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

सामान्य रुग्णालय मालेगाव, जि. नाशिक येथे २२४ पदे मंजूर असून,१२७ पदे भरलेली आहेत. तसेच कंत्राटी पदे भरलेली आहेत. त्याव्दारे रुग्णांवर उपचार करण्यात येतात.

(२) व (३) या संबंधीचे निवेदन आढळून आलेले नाही. महाराष्ट्र वैद्यकीय आरोग्य सेवा गट-अ (ग्रेड पे ६६००) मधील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच महाराष्ट्र वैद्यकीय आरोग्य सेवा गट-अ (ग्रेड पे ५४००) मधील रिक्त पदे भरण्यासाठी शासनाने जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीमार्फत नियमित वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे मुलाखतीव्दारे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. गट-क व गट ड संवर्गातील मंडळ स्तरावरील रिक्त पदे भरण्यासाठी माहे जानेवारी, २०१७ मध्ये लेखी परिक्षा घेण्यात आली असून, सदरहू पदे भरण्याची कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सातारा जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रातील रिक्त पदांबाबत**

**(१६) ९०६८७ (१९-०८-२०१७). श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयात ७१ प्राथमिक आरोग्य केंद्रांसह अनेक आरोग्य उपकेंद्रे असून त्याठिकाणी डॉक्टरांची १५२ पदे मंजूर आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मंजूर पदांपैकी ७२ पदे रिक्त असल्यामुळे तेथील नागरीकांना आरोग्य सेवा मिळत नसल्याने त्यांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

३) असल्यास, उक्त ३२ पदे केंव्हापासून रिक्त आहेत व रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (१४-१२-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सातारा जिल्ह्यात एकुण ७२ प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यन्वित असून सदर प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकारी संवर्गाची एकुण १४४ पदे मंजुर आहेत.

(२) हे खरे नाही.

सातारा जिल्ह्यातील ७२ प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकारी संवर्गाची एकुण १४४ पदे मंजुर असुन ९२ पदे भरलेली व ५२ पदे रिक्त आहेत. उक्त ७२ प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये १ प्रथम वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहे. रिक्त ५२ पदे ही प्राथमिक आरोग्य केंद्रातील व्दितीय वैद्यकीय अधिकारी यांची आहेत. पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण होऊन ६ वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये हजर झाले आहेत. त्यामुळे आरोग्य सेवा नागरिकांना दिल्या जात आहेत. आरोग्य सेवेपासुन जनता वंचित रहात नाही.

(३) सदर पदे वेळोवेळी रिक्त झालेली असुन शासन मान्यतेने पदे भरण्यासाठी सातारा जिल्हा परिषदेमार्फत दोन वेळा जाहिरात देण्यात आली होती. पहिल्यांदा ९ पदे भरण्यात आली आहेत. तद्नंतर दिलेल्या जाहिरातीनुसार एकही पात्र उमेदवार उपलब्ध झाला नाही.

राज्यातील म.वै.आ.से. गट-अ (ग्रेड पे रु. ५४००/-) संवर्गातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे जिल्हाधिकारी स्तरावरुन भरण्याची प्रक्रिया राबवुन सुध्दा सदर पदे रिक्त रहात असल्यामुळे राज्यस्तरावरुन वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या ७२३ रिक्त पदांची जाहिरात दि. १३.०७.२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली असुन पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वसई (जि.पालघर) तालुक्याच्या हद्दीत सुसज्ज रुग्णालय बांधण्याबाबत

**(१७) ९०८९८ (१९-०८-२०१७). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वर पालघर जिल्ह्यातील वसई तालुक्याच्या हद्दीत २०० खाटांचे सुसज्ज रुग्णालय बांधण्याबाबत माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे लेखी निवेदन दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१९-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) नवीन रुग्णालयांना मान्यता देणे व कार्यान्वीत रुग्णालयांचे श्रेणी वर्धन करणे याबाबत सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित बृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही संचालक, आरोग्य सेवा यांचे स्तरावर सुरु असून वसई येथील उपजिल्हा रुग्णालयाचे सामान्य रुग्णालय मध्ये श्रेणीवर्धन करण्याची मागणी निकषानुसार बृहत आराखडयामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**चाकण (ता.खेड,जि.पुणे) येथील ग्रामीण रुग्णालयाच्या नवीन इमारतीस तडे गेल्याबाबत**

**(१८) ९११६२ (१९-०८-२०१७). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकण (ता.खेड,जि.पुणे) येथील ग्रामीण रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांवर औषधोपचार करण्यासाठी ग्रामीण रुग्णालय अपुरे पडत आहे तसेच रुग्णालयाच्या इमारतीच्या मागे मजली इमारत बांधण्यात आली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर इमारतीचे बांधकाम अपूर्ण असतानाही ग्रामीण रुग्णालयाच्या जुन्या इमारतीतून अपूर्णावस्थेत असलेल्या इमारतीमधे रुग्णालय स्थलांतर करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवीन इमारतीच्या निकृष्ठ दर्जाच्या कामामुळे इमारतीला तडे गेले आहेत हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणांची चौकशी करण्याबाबतची मागणी ग्रामस्थांनी व रुग्णांच्या नातेवाईकांनी जिल्हा वैद्यकीय अधिकारी व रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी यांचेकडे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, निवेदनातील तक्रारींच्या अनुषंगाने निकृष्ठ दर्जाचे बांधकाम करणाऱ्या ठेकेदाराविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली व कार्यवाहीची सद्य स्थिती काय आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१९-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

रुग्णालयाची इमारत ही तळमजला+ पहिला मजला अशी बांधण्यात आली आहे

(२) हे खरे नाही

इमारतीचे बांधकाम हे सन २००९ला मंजुर झाले होते. त्यानुसार पहिल्या टप्प्यात तळमजल्याचे बांधकाम हे सन २०१२ ला पूर्ण करण्यात आले व या इमारतीमध्ये रुग्णालयाचे कामकाज सुरु करण्यात आले. तथापि सदरची जागा अपूरी पडत असल्याने सदर इमारतीचा वाढीव (पहिला) मजला सन -२०१६ ला पुर्ण करण्यात आला असून दोन्ही मजल्यावर रुग्णालय सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

सदर इमारत सुस्थितीत असून इमारतीला तडे गेलेले नाहीत.

(४) अशी तक्रार केली असल्याचे निदर्शनास आले नाही

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हात स्त्री रुग्णालयातील रक्त साठवण केंद्र २४ तास सुरु ठेवण्याबाबत**

**(१९) ९१८२७ (१९-०८-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयात जिल्हा स्त्री रुग्णालयातील रक्त साठवण केंद्र बंद असल्याने रुग्णाच्या नातेवाईकांना बाहेरून रक्त आणावे लागत असल्याची तक्रार प्रहर जनशक्ती पक्षाने दिनांक २ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास संचालक, आरोग्य सेवा, उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला तसेच वैद्यकीय अधीक्षक, स्त्री रुग्णालय, अमरावती यांचेकडे केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा स्त्री रुग्णालयातील रक्त साठवण केंद्र २४ तास सुरु ठेवण्यांदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१७-१२-२०१८) :** (१) होय हे खरे आहे.
(२) जिल्हा स्त्री रुग्णालय अमरावती येथील रक्त साठवण केंद्र २४ तास सुरु करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दोडी व वावी (ता.सिन्नर, जि. नाशिक) येथील ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधीक्षक गट-अ आणि वैद्यकीय अधीक्षक वर्ग-१ अशी दोन्ही पदे रिक्त असल्याबाबत**

**(२०) ९१८७१ (१९-०८-२०१७). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक - पुणे आणि नाशिक - शिर्डी या महामार्गावरील मौजे दोडी (ता.सिन्नर, जि. नाशिक) येथील ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधीक्षक गट-अ आणि वैद्यकीय अधीक्षक वर्ग-१ अशी दोन्ही पदे रिक्त असल्याची बाब स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २९ मे २०१७ रोजी वा त्या सुमारास मा. सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे निदर्शनास आणली आहे, हे खरे आहे काय
(२) तसेच, वावी (ता. सिन्नर, जि. नाशिक) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी गट-अ पद रिक्त असल्याची बाब माहे जून २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सर्व सोयींयुक्त व ३०% लहान मुलांची OPD असलेल्या या रुग्णालयात वैद्यकीय अधीक्षक पदाच्या दोन्ही जागा रिक्त असल्याने नाशिक-पुणे आणि नाशिक-शिर्डी महामार्गावर प्रवास करणाऱ्या प्रवाशांना व नागरिकांना २५ कि. मी. दूर सिन्नर येथे येऊन उपचार घ्यावे लागतात, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर रिक्त पदे तातडीने भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०२-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे,

प्राथमिक आरोग्य केंद्र वावी (ता. सिन्नर, जि. नाशिक) येथे २ वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे मंजूर असून सदर पदे रिक्त आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक यांचे दि. २०.६.२०१७ च्या आदेशान्वये डॉ. नितीन के. म्हस्के, वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र ,दापूर, ता. सिन्नर यांचेकडे प्राथमिक आरोग्य केंद्र वावी या पदाचा अतिरिक्त कामकाज सोपविण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही,

ग्रामीण रुग्णालय दोडी येथे बालरुग्णांच्या तपासणी व उपचारासाठी राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत संपूर्ण सिन्नर तालुक्यातील बालकाची आरोग्य तपासणी व उपचार केले जातात. तसेच आंतरुग्ण व बाहयरुग्ण विभागामार्फत उपचार करण्यात येतात.

(४) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (ग्रेड पे रु. ६६००) मधील जिल्हा शल्य चिकित्सक संवर्गातील वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय, दोडी (बु.) जि. नाशिक हे पदे दि.८.५.२०१८ च्या आदेशान्वये भरण्यात आले आहे. तसेच वैद्यकीय अधिकारी, गट-अ (ग्रेड पे रु.५४००) या संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नेवासा फाटा (जि. अहमदनगर ) येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये**
**वैद्यकिय अधिक्षक पद रिक्त असल्याबाबत**

**(२१) ९२२३९ (१९-०८-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवासा फाटा (जि.अहमदनगर) येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये गेल्या दोन वर्षापासून वैद्यकिय अधिक्षक पद रिक्त असल्याने या रुग्णालयाचा अतिरिक्त भार श्रीरामपूर येथील वैद्यकिय अधिकारी यांच्याकडे असल्यामुळे ते फक्त दर शुक्रवारी येत असल्यामुळे वयाच्या दाखल्याकरिता ज्येष्ठ नागरिकांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०२-१२-२०१८) :** (१) हे अंशतः खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय, नेवासा (जि.अहमदनगर) येथील वैद्यकीय अधिक्षक हे पद दि. २८/७/२०१६ पासून रिक्त असल्यामुळे या पदाचा अतिरिक्त कार्यभार श्रीरामपूर येथील वैद्यकीय अधीक्षक यांचेकडे दिलेला आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी वयाचे दाखले देण्यासाठी ते दर शुक्रवारी येत असल्यामुळे ज्येष्ठ नागरिकांची गैरसोय होऊ दिली जात नाही.

२) व ३) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा,गट-अ (ग्रेड पे ६६००) मधील रिक्त पदे नामनिर्देशन व पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

### गडचिरोली जिल्हा सामान्य रुग्णालयाची झालेली दुरवस्था

**(२२) ९३३६३ (२१-०८-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हा सामान्य रुग्णालयात तज्ञ डॉक्टरांचा अभाव, तसेच सोयीसुविधा नसल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रुग्णालयातील गैरकारभाराबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले.

(३) असल्यास, तदनुसार रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत तसेच रुग्णालयात मुलभूत सोयी-सुविधा पुरविण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०२-१२-२०१८) :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) सामान्य रुग्णालय, गडचिरोली या रुग्णालयात महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ पदावर एकूण मंजूर पदे ५१ असून त्यापैकी ३३ पदे भरलेली आहेत.

गट-अ मधील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे. गट-क व गट-ड संवर्गातील पदे भरण्यासाठी माहे जानेवारी, २०१७ मध्ये लेखी परिक्षेत निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बोटेकसा (ता.कोरची, जि. गडचिरोली) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सेविकेच्या तक्रारीबाबत

**(२३) ९३८०७ (२२-०८-२०१७). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोटेकसा (ता.कोरची, जि. गडचिरोली) प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सेविका यांनी तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांविरोधात वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान एकूण चारवेळा तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यातक्रारींबाबत वरिष्ठांनी कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (२०-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही. बोटेकसा (ता. कोरची, जि. गडचिरोली) येथील आरोग्य सेविका यांनी दि.२३.०८.२०१५, दि.०४.०८.२०१६, दि.१७.०८.२०१६ व दि.२२.०८.२०१६ रोजी दिलेल्या तक्रारी हया मौजा बिहिटेकला येथील ग्रामस्थांच्या विरोधात असून, सदर तक्रारी तालुका आरोग्य अधिकारी यांच्या विरोधात नाहीत.

(२) व (३) आरोग्य सेविका, उपकेंद्र बिहिटेकला, प्राथमिक आरोग्य केंद्र, बोटेकसा, जि.गडचिरोली यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी करण्यासाठी जिल्हा स्तरावर चौकशी समिती नेमण्यात आली होती. तसेच पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांच्यामार्फत ही चौकशी करण्यात आली. सदर दोन्ही चौकशी समितीने दिलेल्या अभिप्रायानुसार मौजे बिहिटेकला गावातील लोकांचा आरोग्य कर्मचा-यांस मानसिक व इतर कोणताही त्रास नाही. आरोग्य सेविका हया वारंवार कर्तव्यावर गैरहजर असतात लोकांबरोबर वाद झाल्यावर त्या रुग्णांची तपासणी करत नाही. कर्मचा-यांनी मुख्यालयात रहाणे सक्तीचे असून सुध्दा त्या दि.१७.०८.२०१६ पासून अनधिकृत गैरहजर आहेत. त्या अनुषंगाने त्यांच्याविरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा, (शिस्त व अपील) नियम, १९६४ मधील नियम ३ (१) (अ) नुसार त्यांना निलंबित करण्यात आले होते. निलंबन कालावधीमध्ये त्यांची विभागीय चौकशी पुर्ण करुन, दिनांक १९.०३.२०१८ च्या आदेशान्वये पुर्नस्थापित करुन, त्यांची पदस्थापना प्राथमिक आरोग्य केंद्र, मालेवाडा अंतर्गत उपकेद्र खडकी येथे करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मौजे वरवंड (ता. दौंड, जि. पुणे) येथे ग्रामीण रुग्णालय स्थापन करणेबाबत

**(२४) ९४३१६ (२१-०८-२०१७). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वरवंड (ता.दौंड, जि.पुणे) येथील ग्रामीण रुग्णालय स्थापन करणेबाबत लोकप्रतिनिधीनी दिनांक १५ सप्टेंबर २०१५ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २५ डिसेंबर २००७ रोजी तत्कालीन लोकप्रतिनिधीच्या पाठपुराव्याने जिल्हा नियोजन समितीने रुग्णालय स्थापनेस परवानगी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणी ग्रामीण रुग्णालय व ट्रामा केअर सेंटर सुरु करणेबाबत शासन स्तरावर निर्णय होऊन आरोग्य सेवा संचालनालयामार्फत प्रस्ताव सादर करण्याचे आदेश मा. आरोग्य मंत्री यांनी दिनांक १४ डिसेंबर २०१५ रोजी वा त्यासुमारास दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त ठिकाणी ग्रामीण रुग्णालय व ट्रामा केअर सेंटर सुरु करण्यास शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१९-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) नवीन रुग्णालयांना मान्यता देणे व कार्यान्वीत रुग्णालयांचे श्रेणी वर्धन करणे याबाबत सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित बृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही संचालक, आरोग्य सेवा यांचे स्तरावर सुरु असून वरवंड येथे ग्रामीण रुग्णालय व ट्रामा केअर सेटर सुरु करण्याची मागणी निकषानुसार बृहत आराखडयामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे वावे व मौजे आबलोली (जि.रत्नागिरी) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांचे ग्रामीण रूग्णालयात श्रेणीवर्धन करण्यास होत असलेल्या विलंबाबाबत**

**(२५) ९५१२९ (२७-१२-२०१७). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हयातील मौजे वावे (ता. खेड) आणि मौजे आबलोली (ता. गुहागर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांचे ग्रामीण रूग्णालयात श्रेणीवर्धन करण्याबाबत स्थानिक ग्रामस्थ तसेच लोकप्रतिनिधी यांच्याकडून सातत्याने पत्राद्वारे मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या दोन्ही प्राथमिक आरोग्य केंद्रांवर परिसरातील सुमारे २० ते २५ गावांतील जनतेची आरोग्य सेवा अवलंबून आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रूग्णालयांचा दर्जा उन्नतीकरण करून बृहत आराखडयात समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर कार्यवाही करून या दोन्ही आरोग्य केंद्रांचे श्रेणीवर्धन करण्यात आले आहे काय
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१९-१२-२०१८) :** (१), (२), (३) व (४) हे खरे आहे.
नवीन रुग्णालयांना मान्यता देणे व कार्यान्वीत रुग्णालयांचे श्रेणी वर्धन करणे याबाबत सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित बृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही संचालक, आरोग्य सेवा यांचे स्तरावर सुरु असून मौजे वावे (ता. खेड) आणि मौजे आबलोली (ता. गुहागर) येथे ग्रामीण रुग्णालय सुरु करण्याची मागणी निकषानुसार बृहत आराखडयामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात बिगर आदिवासी क्षेत्रात बालविकास केंद्र स्थापन करणेबाबत**

**(२६) ९५४८३ (२६-१२-२०१७). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बिगर आदिवासी क्षेत्रात लहान बालकांच्या कुपोषण समस्येवर मात करण्यासाठी २० जिल्ह्यांमध्ये ३० हजार बालविकास केंद्र सुरु करण्याचा शासनाने निर्णय घेतला असल्याचे दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बालविकास केंद्रे कोणकोणत्या जिल्ह्यात स्थापन करण्यात येणार आहेत व त्यासाठी किती आर्थिक तरतूद करण्यात आली आहे,

(३) तसेच, सदर योजनेचे / कार्यक्रमाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व आतापर्यंत किती बालविकास केंद्रे प्रत्यक्षात सुरु करण्यात आली आहेत,

(४) असल्यास, या योजनेचे संनियत्रण कोणामार्फत करण्यात येणार आहे,

(५) तसेच, सार्वजनिक आरोग्य विभागाकडून राबविणाऱ्या याच योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून मिळणारा निधी बंद होण्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१९) :** (१) राज्यात बिगर आदिवासी क्षेत्रात लहान बालकांच्या कुपोषण समस्येवर मात करण्यासाठी ग्राम बालविकास केंद्र सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तथापि, केंद्रांची संख्या निश्चित करण्यात आली नाही. तीव्र कुपोषित बालकांच्या संख्येनुसार बाल विकास केंद्र सुरु करण्यात येतील.

(२) बाल विकास केंद्र संपूर्ण राज्यात ग्रामीण आदिवासी प्रकल्पांमध्ये सुरु करण्यात येणार आहेत. कुपोषित बालकांसाठी प्रत्यक्ष बाल विकास केंद्र सुरु झाल्यानंतर बालकांच्या संख्येनुसार निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

(३) अंगणवाडी स्तरावर सर्व बालकांचे वजन, उंची, दंडघेर इत्यादि बाबींचे मोजमाप करुन बालकांची वर्गवारी ही सर्वसाधारण, मॅम (Moderately acute malnourished) व सॅम (Severely acute malnourished) अशी वर्गवारी करण्यात येवून सॅम बालकांची आरोग्य अधिकारी यांचेमार्फत तपासणी करुन आरोगय अधिकाऱ्याने सॅम बालक असल्याचे प्रमाणपत्र दिल्यानंतर त्यांना VCDC मध्ये प्रवेश देण्यात येईल व त्याबालकांस VCDC मध्ये Energy Dense Nutritious Food देण्यात येईल. तसेच त्या बालकांना आवश्यक असणारे औषधे देण्यात येतील. या बालकांना तीन महिने VCDC मध्ये EDNF व औषधोपचार देण्यात येईल. तसेच, या बालकांमध्ये सुधारणा आढळून न आल्यास त्यांना Child Rehabilitation Centre मध्ये दाखल करण्यात येईल.

(४) या योजनेचे संनियंत्राण जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाक) यांचेमार्फत करण्यात येणार आहे.

५) केंद्र शासनाकडून सदर निधी बंद करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. निधी बंद करताना केंद्र शासनाकडून विशिष्ट कारणे देण्यात आलेली नाहीत.

---

**चाकण (जि. पुणे) ग्रामीण रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालय म्हणून मान्यता देण्याबाबत**

**(२७) ९९७६६ (०२-०१-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकण (जि. पुणे) ग्रामीण रुग्णालयातील बाह्यरुग्ण संख्या वाढत असल्याने तीस खाटांचे रुग्णालय अपुरे पडत आहे त्यामुळे चाकणला ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय करण्याचा प्रस्ताव आरोग्य उपसंचालक, पुणे यांचेमार्फत शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने ग्रामीण रुग्णालयास उपजिल्हा रुग्णालयाची मान्यता देण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (१९-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित नवीन रुग्णालय सुरु करणे व कार्यान्वित रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करणे यासाठी जोड बृहत आराखडा तयार करण्यात येत असून चाकण येथे नवीन उपजिल्हा रुग्णालय सुरु करण्याची मागणी जोड बृहत आराखडयामध्ये निकषानुसार प्रस्तावित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगोले (जि.सोलापूर) येथील ट्रामा केअर युनिट इमारतीचे बांधकाम सुरु करण्याबाबत**

**(२८) १०१४११ (०४-०१-२०१८). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरज सोलापूर नॅशनल हायवे क्र.-१६६ वर २०० किमी अंतरावर दररोज वाहनाचे अपघात होत असून जखमी व्यक्तींवर उपचार करण्यासाठी कोणतीही सोय नसलेने शासनाने सांगोले (जि.सोलापूर) येथील कॉटेज हॉस्पिटलच्या उपलब्ध जागेवर ट्रामा केअर युनिट इमारतीच्या रुपये ४.३३ कोटीच्या खर्चास दिनांक १२ जून २०१५ रोजी वा त्यासुमारास प्रशासकीय मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सन २०१३-१४ च्या DSR च्या आधारावर खर्चास मान्यता दिली आहे काय,

(३) असल्यास माहे जुलै २०१७ च्या पुरवणी अंदाजपत्रकामध्ये टोकन स्वरूपामध्ये रक्कम रु. १००० मंजूर करण्यात आले आहे काय,

(४) असल्यास, इमारतीच्या बांधकामास सन २०१७-१८ च्या DSR वर आधारित अंदाजपत्रक तयार करून केंव्हा सुरुवात करण्यात येईल?

**डॉ. दीपक सावंत (०७-१२-२०१८) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) ग्रामीण रुग्णालय, सांगोला येथील ट्रामा केअर युनिट इमारत बांधकामास सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये १.०० कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. याबाबत मा.राज्यमंत्री (सा.आ) यांचे अध्यक्षतेखाली दि.४/१०/२०१८ रोजी बैठक संपन्न झाली असून सदर ट्रामा सेंटरच्या इमारतीचे बांधकाम हरीत संकल्पनेवर आधारीत असल्याने सुधारीत आराखडे व अंदाजपत्रक त्वरीत सादर करण्याबाबत संबंधित अधिका-यांना बैठकीत निर्देश देण्यात आले आहे.

---

**मुंबई राज्य कामगार विमा योजनेच्या कार्यालयातील समवैद्यकीय पदे भरण्याकरीता देण्यात आलेल्या जाहिरातीत अनियमितता झाल्याबाबत**

**(२९) १०४८६७ (०७-०४-२०१८). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.संजय पोतनीस (कलिना), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुनिल शिंदे (वरळी), अॅड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई राज्य कामगार विमा योजनेच्या कार्यालयातील समवैद्यकीय पदे भरण्याकरीता दिनांक १७ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास जाहिरात देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच, उपरोक्त जाहिरात प्रसिध्द केल्यानंतर एक आठवडयानंतर सुधारित जाहिरात देऊन हृदयस्पंदन आलेख तंत्रज्ञ या पदाच्या शैक्षणिक अर्हतेमध्ये बदल करण्यात आला व अनुभवाची अट काढून टाकण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भरती प्रकिया रद्द करुन पुन्हा नव्याने भरती प्रक्रीया राबविण्याबाबतचे निवेदन महाराष्ट्र राज्य चतुर्थश्रेणी सरकारी कर्मचारी संघटनेने दिनांक ३० डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.आरोग्य मंत्री, आरोग्य राज्यमंत्री, आरोग्य सचिव, आयुक्त, राज्य कामगार योजना यांचेकडे सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर भरती प्रकिया रद्द करुन नव्याने भरती प्रकिया राबविण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२०-१२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

सदर जाहिरातीमध्ये हृदय स्पंदन आलेख तंत्रज्ञ पदाचे उपलब्ध असलेले दि. १७.०४.१९७४ च्या सेवाप्रवेश नियमानुसार "आलेख एस.एस.सी. उत्तीर्ण शैक्षणिक अर्हता व ६ महिन्याचा ईसीजी मशिन हाताळण्याचा अनुभव" असणे आवश्यक असे निकष दर्शविण्यात आले होते. तथापि, ०४.०४.२००१ चे हृदय स्पंदन आलेख तंत्रज्ञ या पदाचे सुधारीत सेवाप्रवेश नियम उपलब्ध झाल्यानंतर त्यानुसार आयुक्त, राज्य कामगार विमा योजना, मुंबई या कार्यालयाच्या दिनांक २४.०८.२०१७ च्या पत्रान्वये मुख्य व्यवस्थापक, महाऑनलाईनच्या कार्यालयास दिनांक ०४.०४.२००१ च्या सुधारीत सेवाप्रवेश नियमानुसार सदर पदाच्य शैक्षणिक अर्हतेमध्ये एस.एस.सी. ऐवजी बी.एस.सी. (भौतिकशास्त्र/रसायनशास्त्र/जीवशास्त्र) अशी शैक्षणिक अर्हता नमूद करण्यात आली असून, अनुभवाची अट सक्तीची नसून फक्त १ वर्षाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना पसंतीक्रम देण्यात तरतूद असल्याचे सुधारणा करण्याबाबत मुख्य व्यवस्थापक, महाऑनलाईन यांना कळविण्यात आले.

(३) होय, हे खरे आहे.

(४) सदर भरती प्रक्रिया निर्णयाप्रमाणे राबविण्यात आलेली असल्याचे ती रद्द करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**वैद्यकीय महाविद्यालयाची मूल्यांकनाची प्रक्रिया परिणामकारक राबविण्याबाबत**

**(३०) १०५१०८ (१०-०४-२०१८). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैद्यकीय महाविद्यालयाची मूल्यांकनाची प्रक्रिया परिणामकारक राबविण्यासाठी शासनाने महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम १९९८ कलम ७२ (१) नुसार समिती स्थापन केली असून समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहवालात कोणत्या शिफारसी करण्यात आल्या आहेत,

(३) असल्यास, शिफारशीची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-१२-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

शासनाने महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक मार्फत विद्यापीठ अधिनियम १९९८ कलम ७२ (१) नुसार राज्यातील सर्व आयुर्वेद, होमिओपॅथी, भौतिकोपचार, नर्सिंग महाविद्यालयांचे परिणामात्मक मुल्यांकन करण्याची कार्यवाही सुरु केली आहे. सदर अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात आकस्मिकरीत्या झालेल्या व्यक्तीच्या मृत्यूचे प्रमाणपत्र तातडीने मिळण्याबाबत**

**(३१) १०५५३६ (३१-०३-२०१८). श्री.मोहन फड (पाथरी), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) राज्यात कुणाही व्यक्तीच्या मृत्युनंतर अंत्यसंस्कार करण्यासाठी मृत्यू प्रमाणपत्र देण्यासाठी वैद्यकीय अधिकाऱ्याचा किंवा उपचार करणाऱ्या ॲलोपॅथी डॉक्टरचा दाखला देणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉक्टरचे प्रमाणपत्र नसल्यास शवविच्छेदन केल्याशिवाय अंत्यसंस्कार करण्याची परवानगी देण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एखाद्या व्यक्तीचा नैसर्गिक मृत्यू आकस्मिकरीत्या झाल्यास त्या व्यक्तीला डॉक्टरचे प्रमाणपत्र मिळत नाही व त्यामुळे कारण नसतानाही शवविच्छेदन करण्याची वेळ

लागत असल्यामुळे तसेच शवविच्छेदनाची व्यवस्था पुरेशी उपलब्ध नसल्यामुळे अनेक वेळा २ ते ३ दिवसपर्यंत अंत्यसंस्कार होवू शकत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मृत व्यक्तीच्या नातेवाईकांचे दुःख कमी व्हावे व त्यांचा त्रास कमी व्हावा यासाठी मृत्यूचे प्रमाणपत्र देण्याचे अधिकार आयुर्वेदिक व होमियोपॅथीक डॉक्टरांनाही देण्यासंदर्भात राज्य शासन निर्णय घेणार आहे काय,
(५) त्याचप्रमाणे मृत व्यक्तीचे नातेवाईक तसेच समाजातील अन्य प्रतिष्ठित व्यक्ती यांचे प्रमाणपत्र व ना हरकत पत्र घेवून ज्या मृत्यू मध्ये संशयाची शक्यता नसेल अशा मृत व्यक्तीच्या अंत्यसंस्कारांना शवविच्छेदन न करताही परवानगी देण्याचा निर्णय शासन घेणार आहे काय ?

**डॉ. दीपक सावंत (२६-१२-२०१८) :** (१) हे अशंतः खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही पोलीसांच्या विनंतीनुसार शवविच्छेदन करण्यात येते.
(४) जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ मधील तरतुदी नुसार वैद्यकिय व्यावसायिकांना परवानगी आहे त्यामुळे प्रश्न उद्भवत  नाही.
(५) नियमानुसार नोंदणी होते. पोलिसांच्या विनंतीनुसार शवविच्छेदन केले जाते. सबब प्रश्न उद्भवत नाही.

---

**येवला व नगरसूल (जि.नाशिक) येथील ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत**

**(३२) १०५७४५ (०६-०४-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येवला व नगरसूल (जि.नाशिक) येथील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधीक्षक व अधिकारी यांची रिक्त पदे भरण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ नोव्हेंबर २०१७ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येवला ग्रामीण रुग्णालय (जि.नाशिक) येथील एक वैद्यकीय अधीक्षक व तीन वैद्यकीय अधिकाऱ्यांपैकी फक्त एक वैद्यकीय अधिकारी पद भरले आहे, तसेच नगरसूल (जि.नाशिक) येथे वैद्यकीय अधीक्षक व वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याने रुग्णाची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त पदे भरण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२०-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशतः खरे आहे.
ग्रामीण रुग्णालय येवला, जि. नाशिक येथे  वैद्यकीय अधीक्षकाचे एक पद मंजूर असून सदर पद रिक्त आहे. तसेच वैद्यकीय अधिकाऱ्यांची तीन पदे मंजूर असून एक पद भरलेले आहे व

दोन पदे रिक्त आहेत. ग्रामीण रुग्णालय नगरसूल, जि. नाशिक येथील वैद्यकीय अधिक्षकाचे पद रिक्त आहे. वैद्यकीय अधिकाऱ्यांची तीन पदे मंजूर असून त्यापैकी दोन पदे भरलेली आहेत व एक पद रिक्त आहे. सदर रुग्णालयातील उपलब्ध वैद्यकीय अधिकारी तसेच एनएचएम व आयपीएचएस अंतर्गत वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत रुग्णांना रुग्णसेवा पुरविण्यात येते.
(३) वैद्यकीय अधीक्षकाची पदे पदोन्नतीने व नामनिर्देशनाने भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चिखली (जि.बुलढाणा) तालुक्यातील ग्रामीण भागातील आरोग्य विभागातील रिक्त पदे भरणेबाबत

**(३३) १०७७१२ (०५-०४-२०१८). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (जि.बुलढाणा) तालुक्यातील एकलारा, अमडापूर, अंत्री खेडेकर, किन्होळा, शेळगाव आटोळ व उंद्री येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात ग्रामीण भागातील रुग्णांवर योग्य उपचार करण्यासाठी आवश्यक असणारे वैदयकिय अधिकारी, कर्मचारी नसल्याने ग्रामस्थांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदरील ग्रामीण भागातील आरोग्य रुग्णालयात ८ वैद्यकिय अधिकारी व ९ कर्मचारी पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रश्नांची दखल घेऊन बुलढाणा जिल्हयात आरोग्य विभागात आवश्यक असणारे रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, त्यामागील कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१४-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.
बुलढाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यात एकुण सहा प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यन्वित आहेत. सदर सहा प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी ते कर्मचारी यांची एकूण ९१ पदे मंजुर असून ८७ पदे भरलेली फक्त ४ पदे रिक्त आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या ७२३ पदांची जाहिरात शासन स्तरावरुन देऊन वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुकाणा (ता.नेवासा, जि.अहमदनगर) गावातील अंगणवाडीत देण्यात येणाऱ्या पोषण आहारात अळया आढळून आल्याबाबत**

**(३४) १०७८७१ (०७-०४-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुकाणा (ता.नेवासा, जि. अहमदनगर) गावातील अंगणवाडीमधील ० ते ६ वर्षाच्या बालकांसह गरोदर मातांना देण्यात येणा-या घरपोच पोषण आहारात माहे डिसेंबर २०१७ मध्ये वा त्यादरम्यान अळया आढळून आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-१२-२०१८) :** (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**डहाणू (जि. पालघर) तालुक्यात बांधलेली ट्रामा केअर सेंटर इमारत कार्यान्वित करण्याबाबत**

**(३५) १०८३५९ (०७-०४-२०१८). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि. पालघर) तालुक्यात शासनाने सुमारे ५४ लाख रुपये खर्च करुन बांधलेली ट्रामा केअर सेंटर इमारतीस वीज पुरवठा, पाणी पुरवठा तसेच डहाणू नगरपरिषदेचे भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची इमारत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सार्वजनिक आरोग्य विभागाकडे हस्तांतरित करण्यात आलेली आहे काय,

(३) नसल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व शासनस्तरावरून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१९-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

सदर ट्रामा केअर सेंटरचे बांधकामामध्ये अनेक त्रुटी असुन स्वतंत्र लाईट व्यवस्था, पाण्याची स्वतंत्र व्यवस्था नाही. त्यामुळे इमारत अद्‌याप हस्तांतरीत झालेली नाही. त्रुटीची पुर्तता करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पालघर जिल्ह्यामधील अंगणवाडीतील मुलांना पोषण आहार पुरविणाऱ्या महिला बचतगटांच्या आहार सामग्रीची देयके थकविल्याबाबत**

**(३६) १०८८०१ (०४-०४-२०१८). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यामधील अंगणवाडीतील मुलांना पोषण आहार पुरविणाऱ्या महिला बचतगटांच्या आहार सामग्रीची देयके थकविल्यामुळे महिला बचतगटांच्या सदस्यांनी दिनांक १६ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास पालघर जिल्हापरिषद कार्यालयावर मोर्चा काढून मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय;
(२) असल्यास, यासंदर्भात राज्य शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय व त्याचे निष्कर्ष काय आहेत;
(३) असल्यास, तद्नुसार अंगणवाडीतील मुलांना पोषण आहार पुरविणाऱ्या महिला बचतगटांची थकित देयके अदा करण्याबाबत शासनाकडून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-१२-२०१८) :** (१) होय.
(२) सदर निवेदनातील मुद्ये हे वेगवेगळया विभागाशी संबंधीत आहेत. यापैकी महिला व बाल विकास विभागाशी संबंधीत मुद्यांतर कार्यवाही करण्यात आली आहे.
(३) बचतगटांची माहे मार्च, २०१८ पर्यंतची देयके अदा करण्यासाठी निधी वितरीत करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे केम (ता. करमाळा, जि.सोलापूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांचे रुपांतर ग्रामीण रुग्णालयामध्ये करण्याबाबतची मागणी**

**(३७) १०९००९ (०१-०४-२०१८). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे केम (ता. करमाळा, जि.सोलापूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांचे रुपांतर ग्रामीण रुग्णालयामध्ये करुन दर्जावाढ करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री, संचालक आरोग्य सेवा व उपसंचालक, आरोग्य सेवा यांचेकडे निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, करमाळा तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालय २७ कि.मी. अंतरावर दूरवर असल्याने गावातील सर्पदंश, गर्भवती महिला, अपघाती रुग्ण व दुर्धर विकारावर तातडीने योग्य

ते औषधोपचार, आरोग्य सुविधा तसेच तज्ञ डॉक्टर यांचा अभाव असल्याने प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार होऊ शकत नाही म्हणून उक्त प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालयामध्ये रुपांतर करुन दर्जावाढ करावी या मागणीच्या अनुषंगाने आतापर्यंत काय निर्णयात्मक कार्यवाही करण्यात आली आहे,

(३) अद्याप निर्णय घेण्यात आला नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (१९-१२-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे.

नवीन रुग्णालयांना मान्यता देणे व कार्यान्वीत रुग्णालयांचे श्रेणी वर्धन करणे याबाबत सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित बृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही संचालक, आरोग्य सेवा यांचे स्तरावर सुरु असून मौजे केम (ता. करमाळा, जि.सोलापूर) येथे ग्रामीण रुग्णालय सुरु करण्याची मागणी निकषानुसार बृहत आराखडयामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईसह राज्यामध्ये सर्व्हायकल कर्करोगाचे प्रमाण वाढत असलेबाबत**

**(३८) १०९५५४ (१०-०४-२०१८). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यामध्ये डायबिटीस, बीपी, कावीळ (हॅपीटायटस-बी) या रोगाचा प्रादुर्भाव वाढल्यामुळे शासन व काही सामाजिक संस्थांनी माफक व सवलतीच्या दरात इंजेक्शन उपलब्ध करून दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या वय वर्ष ११ ते २५ या वयोदरम्यानच्या मुलींमध्ये सर्व्हायकल कर्करोगाचे प्रमाण वाढत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्व्हायकल कर्करोग प्रतिबंधक इंजेक्शनची एका वेळेची किंमत सुमारे ३ ते ४ हजार रुपये असून अशी ३ इंजेक्शने काही कालांतराने घेतल्यास सर्व्हायकल कर्करोग होत नाही असे तज्ञांचे मत असून सर्व सामान्य गरीब घरातील मुलींना ही किंमत परवडत नसल्याने आरोग्य शिबीर आयोजित करून माफक दरात ही इंजेक्शने उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१९-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

मुंबईसह राज्यामध्ये स्वाईन फल्यू, डेंग्यू, हिवताप चिकुनगुनिया आणि लेप्टोस्पायरोसिस असे विविध आजार आढळतात. यापैकी प्रत्येक आजारासाठी प्रतिबंधात्मक लस उपलब्ध नाही. तथापि, इन्फल्युएंझा प्रतिबंधासाठी अतिजोखिमीच्या व्यक्तींना मोफत व ऐच्छिक लसीकरण करण्यात येते.

विविध आजारांच्या तपासणीसाठी मुंबईसह राज्यात वेळोवेळी अनेक आरोग्य शिबीरांचे आयोजन केले जाते. तसेच असंसर्गजन्य रोग विभागामार्फत आरोग्य शिबीरांचे आयोजन केले जाते व त्यात उच्च रक्तदाब, मधुमेह इत्यादी आजाराची तपासणी करण्यात येते.

(२) हे खरे नाही.

(३) टाटा मेमोरीअल रुग्णालय, मुंबई येथील तज्ञांच्या मतानुसार सर्व्हायकल कॅन्सरच्या प्रमाणात अथवा त्यामुळे होणाऱ्या मृत्यूंमध्ये अशा प्रकारच्या लसीकरणामुळे निर्णायक फरक पडतो असे आढळून आलेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे येथील मनोरुग्णालयाच्या जागेवर नवीन रेल्वे स्थानक उभारण्यासंदर्भात**

**(३९) ११०२१० (०५-०४-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील मनोरुग्णालयाच्या जागेवर नवीन रेल्वे स्थानक उभारण्यासंदर्भात ठाणे येथे मा.पालकमंत्री, ठाणे जिल्हा, मा.सार्वजनिक आरोग्यमंत्री व लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान बैठक घेऊन महत्वाचे निर्णय घेऊनही अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही केलेली नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ च्या दुस-या आठवड्यात निदर्शनास आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्नी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१९-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

ठाणे मनोरुग्णालयाची जागा ठाणे रेल्वे स्टेशनच्या विकासासाठी ठाणे महानगरपालिकेस उपलब्ध करुन देण्याबाबतच्या पर्यायची तपासणी करण्यासाठी मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली दि. २९/०८/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीचा अहवाल प्राप्त झाल्यनंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही

---

**उमरखेड ( जि. यवतमाळ ) शहरात महिला डॉक्टरकडून सिझरच्या नावाखाली आर्थिक पिळवणूक करीत असल्याची तक्रार**

**(४०) ११०५५१ (०१-०४-२०१८). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड (जि. यवतमाळ) शहरात एका प्रख्यात महिला डॉक्टरकडून सिझरच्या नावाखाली आर्थिक पिळवणूक करीत असल्याची तक्रार जिल्हा आरोग्य अधिकारी, यवतमाळ यांच्याकडे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तक्रारीनुसार शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२६-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) होय, शासन निर्णय दि.२६.०३.२०१० अन्वये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यवतमाळ मधील गठीत समितीच्या तज्ञाकडून चौकशी करण्यात आली आहे.

(३) चौकशी अंती संबंधित डॉक्टर निर्दोष असल्याचे सिद्ध झाले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोरा (ता. हिंगणघाट, जि.वर्धा) येथील अॅलोपॅथी दवाखान्यातील डॉक्टराचे पद रिक्त असल्याबाबत**

**(४१) ११०८१६ (१०-०४-२०१८). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरा (ता. हिंगणघाट, जि.वर्धा) येथील अॅलोपॅथी दवाखान्यातील डॉक्टरांचे पद रिक्त असल्याने ग्रामस्थांनी डॉक्टरांची नियुक्ती करा अथवा दवाखान्याला कुलूप लावू असा ठराव ग्रामसभेत घेतल्याचे माहे सप्टेंबर २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू दवाखान्यावर पसिरातील सुमारे १८ ते २० गावे अवलंबून असून सर्व रुग्ण उपचाराकरीता येथे येत असतात; परंतु डॉक्टरच नसल्याने रुग्णांना उपचारासाठी ३० कि.मी. अंतरावर तालुक्याच्या ठिकाणी जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दवाखान्यात तातडीने डॉक्टरांची नियुक्ती करून हा दवाखाना सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (२०-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) उपसंचालक, नागपूर यांचे आदेश दिनांक ०९.०३.२०१७ अन्वये प्राथमिक आरोग्य केंद्र, गिरड व अॅलोपॅथी दवाखाना वायगांव येथील डॉक्टरांची सेवा कोरा (ता.हिंगणघाट जि. वर्धा) येथे संलग्न करण्यात आलेली असल्याने रुग्णांना उपचारासाठी तालुक्याच्या ठिकाणी जावे लागणार नाही.

(३) वैद्यकीय अधिकारी, गट-अ संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

**पंढरपूर, मंगळवेढा (जि.सोलापूर) जिल्हा परिषदेने प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि उपकेंद्राच्या प्रस्तावाला मंजूरी देण्याबाबत**

**(४२) १११०९७ (०५-०४-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) पंढरपूर, मंगळवेढा तालुकासह सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेने ११ प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि ६ उपकेंद्राचा प्रस्तावास मंजूरी मिळाली नसल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंढरपूर-मंगळवेढा तालुक्यातील लोकसंख्या वाढल्याने व साथीच्या विविध आजारांना नागरिकांना सामोरे जावे लागत असल्यामुळे जिल्हा प्रशासनाने व शासनाकडून आरोग्य केंद्राबाबत अद्यापही अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सोलापूर जिल्ह्यातील प्रलंबित असलेल्या ११ प्राथमिक आरोग्य केंद्रे व ६ उपकेंद्राच्या प्रस्तावास तात्काळ मंजूरी मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१९-१२-२०१८) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

नवीन रुग्णालयांना मान्यता देणे व कार्यान्वीत रुग्णालयांचे श्रेणी वर्धन करणे याबाबत सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित बृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही संचालक, आरोग्य सेवा यांचे स्तरावर सुरु असून पंढरपूर, मंगळवेढा तालुक्यासह सोलापुर जिल्हातील प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्र सुरु करण्याची मागणी निकषानुसार बृहत आराखडयामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्हयातील आरोग्य केंद्रामध्ये हिरकणी कक्ष उभारण्याबाबत**

**(४३) १११९०६ (०४-०४-२०१८). श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील २४ आरोग्य केंद्रामध्ये हिरकणी कक्ष स्थापन करण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२६-१२-२०१८) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) राज्य शासनाच्या दि.०६.०२.२०१७ रोजीच्या मार्गदर्शक सुचनेनुसार मातांना स्तनपानासाठी व शिशुपोषणाबाबत समुपदेशन करण्याच्या उद्देशाने राज्यात एकूण ७२१ हिरकणी कक्ष स्थापन करण्यात आले असून या अंतर्गत गरोदर व स्तनदा मातांसाठी ५४१८९ इतके समुपदेशन सत्र घेण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक येथील राज्य कामगार विमा रुग्णालयात भरतीप्रक्रियेत झालेला गैरव्यवहार**

**(४४) ११३०८७ (११-०४-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील राज्य विमा कामगार रुग्णालयात माजी सैनिकांच्या आरक्षणात नियमांचे उल्लंघन करुन भरतीप्रक्रियेत झालेल्या गैरव्यवहाराची माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास कामगार विमा योजनेंतर्गत परिचारक पदासाठी झालेल्या भरतीप्रक्रिया पार पाडतांना निवड झालेल्या परीक्षार्थींच्या यादीत जवळपास ३९ जणांना माजी सैनिकांसाठी असलेल्या आरक्षणात भरती करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाच्या दिनांक ३० एप्रिल, २०१३ आणि २ सप्टेंबर, १९८३ च्या निर्देशानुसार माजी सैनिकांसाठी राखीव असलेल्या १५ टक्के आरक्षणाचा फायदा फक्त जे सैनिक शहीद अथवा अपंग झालेले आहे अशा सैनिकांच्या पाल्यांनाच नोकरीत माजी सैनिकांच्या आरक्षणात नोकरी मिळू शकते, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय व त्यानुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२०-१२-२०१८) :** (१), (२), (३), (४) व (५) राज्य कामगार विमा योजनेअंतर्गत परिचारिका संवर्गात एकूण ४२२ रिक्त पदे भरण्यासाठी दिनांक १७.०८.२०१७ रोजीच्या वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली या ४२२ रिक्त पदांपैकी विविध संवर्गासाठी माजी सैनिक प्रवर्गासाठी एकूण ६३ पदे निश्चित करण्यात आली होती याबाबत दिनांक २५ व २६, ऑक्टोबर, २०१७ रोजी महाऑनलाईन परीक्षेस माजी सैनिक प्रवर्गातून एकूण ७६ उमेदवारांनी परीक्षा दिली असून एकूण ७६ उमेदवारांपैकी १९ उमेदवार परिक्षेत उत्तीर्ण झाले व ५७ उमेदवार अनुत्तीर्ण झाले या उत्तीर्ण १९ उमेदवारांना दि १३ ते २९ नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत त्यांची मुळ कागदपत्रे तपासणीसाठी बोलविण्यात आले. या कालावधीत एकूण उत्तीर्ण १९ उमेदवारांपैकी १६ उमेदवार उपस्थित राहिले. उपरोक्त १६ उमेदवारांपैकी १५ उमेदवाराकडे माजी सैनिक प्रमाणपत्र आढळून आले नाही. केवळ एकच उमेदवाराकडे माजी सैनिक असल्याबाबतचे प्रमाणपत्र आढळून आल्याने त्यांना दिनांक २९.११.२०१७ च्या राज्य कामगार विमा योजना कार्यालयाच्या आदेशान्वये नियुक्ती देण्यात आलेली आहे.

---

**प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजनेबाबत**

**(४५) ११३१४३ (०४-०४-२०१८). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माता व बालमृत्यूचा दर कमी करण्यासाठी तत्कालीन केंद्र शासनाने इंदिरा गांधी मातृत्व योजना ही १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना देशात लागू केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इंदिरा गांधीच्या नावाने अंमलात असलेली सदर योजना सध्याच्या केंद्र शासनाने बंद करुन त्याऐवजी "प्रधानमंत्री मातृत्ववंदना योजना" दिनांक १ जानेवारी, २०१८ पासून राज्यात लागू करण्यात येणार असल्याचे दिनांक १० डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनामार्फत जाहीर करण्यात आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तुत योजना १०० टक्के केंद्र पुरस्कृत या ऐवजी ६० टक्के केंद्र शासन व ४० टक्के राज्य शासन या तत्वावर राबविली जाणार असून, त्यामुळे राज्यावर ४० टक्के निधीचा आर्थिक भार पडणार आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्याची सध्याची आर्थिक स्थिती लक्षात घेता, ४० टक्के आर्थिक भार उचलणे शासनास शक्य आहे काय,

(५) नसल्यास, सदर योजना पूर्वीप्रमाणे १०० टक्के केंद्र पुरस्कृत करण्याबाबत केंद्र शासनाकडे मागणी करण्याबाबत राज्य शासनाची भूमिका काय आहे व त्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२०-१२-२०१८) :** (१) हे अशंतः खरे आहे.

सदर योजना देशातील निवडक जिल्हयात लागू केली होती त्यात राज्यातील फक्त भंडारा व अमरावतीचा समावेश होता.

(२) हे अशंतः खरे आहे.

प्रधानमंत्री मातृत्व वंदना ही केंद्र पुरस्कृत देशव्यापी योजना १ जानेवारी, २०१७ पासून राज्यात कार्यान्वित केली आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) होय, हे शक्य आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## देशात मानसिक आजारावर संशोधन करणारी "निमहान्स" या संस्थेचे सॅटेलाईट केंद्र राज्यामध्ये सुरु करण्याबाबत

**(४६) ११६७२४ (२८-०७-२०१८). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशात मानसिक आजारावर संशोधन करणारी एकमेव संस्था "निमहान्स" या संस्थेचे सॅटेलाईट केंद्र राज्यामध्ये सुरु करण्याचा राज्य शासनाचा मानस असल्याचे सन २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात स्मरणशक्ती चिकित्सालय (मेमरी क्लिनिक) सुरु करण्याचा ही निर्णय झाला असून तेथे मनोरुग्णांना प्रशिक्षण देणार असल्याचे ही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यामध्ये मानसोपचार तज्ञांची कमतरता लक्षात घेता राज्यातील वैद्यकीय अधिकारी आणि परिचारिकांना मानसिक आजार व त्यासंबंधी उपचाराचे विशेष प्रशिक्षण देखील दिले जाणार असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मानसिक स्वास्थ्यासंबंधी जागृती करण्याकरिता राज्यामध्ये "निमहान्स" या संस्थेचे सॅटेलाईट केंद्र सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१९-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे अशत: खरे आहे.

मेमरी क्लिनिक सुरु करण्याचा निर्णय झाला आहे. तेथे स्मृतीभ्रंश असणा-या रुग्णांची तपासणी व त्याबाबत उपचार करण्यात येणार आहे. राज्यातील २८ जिल्हयात प्रायोगिक तत्वावर दि.२१ सप्टेंबर २०१८ पासुन मेमेरी क्लिनिक सुरु करण्यात आले आहेत

(३) हे खरे आहे.

(४) याबाबतच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात मुलींच्या जन्मदरांमध्ये होत असलेली घट

**(४७) ११७२०३ (२३-०७-२०१८). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुलीच्या जन्मदरात नगण्य प्रमाणात वाढ झाल्याची बाब केंद्रीय अहवालामधून माहे एप्रिल-२०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ठाणे जिल्हयात मुलीचा जन्मदर ७७० इतका निचांक व अहमदनगर

जिल्हयातमुलींचे जन्मदर कायम कमी होत असल्याची बाब माहे एप्रिल-२०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याकडे आरोग्य विभागाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मूलींच्या जन्मदरात होणारी घट रोखण्यासाठी जनजागृती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०२-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) राज्यात मुलींच्या जन्मदरात होणारी घट रोखण्यासाठी व्यापक जनजागृतीसाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे,
• मुलीच्या जन्माचे स्वागत, महत्व आणि मुलीच्या लग्नाचे वय या विषयांचे टीव्ही स्पॉट चे प्रसारण, प्रसवपूर्व गर्भलिंगनिदान कायदयामधील तरतुदी इ. विषयी माहिती देणाऱ्या रेडिओ जिंगलचे आकाशवाणी मुंबई व पुणे केंद्रावरुन प्रसारण, आरोग्य पत्रिकेच्या मासिक अंकात आंतरराष्ट्रीय बालिका दिन या विषयावर लेख प्रसिध्द.
• www.amchimulgi.gov.in या संकेतस्थळाची स्थापना करण्यात आली. सदर वेबसाईटवर पीसीपीएनडीटी कायदयाच्या उल्लंघन संदर्भात महाराष्ट्रातील सर्व सामान्य व्यक्ती गर्भलिंगनिदान व बेकायदेशीर गर्भपाताच्या संदर्भात ऑनलाईन तक्रार दाखल करु शकतात.
• लिंग गुणोत्तर प्रमाण हा विषय जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत चर्चेसाठी ठेवण्याबाबत सर्व जिल्हाधिकारी यांना कळविण्यात आले आहे.
• कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या केंद्राबाबत माहिती उपलब्ध करुन देणाऱ्या व्यक्तीस संबधित केंद्राविरुध्द न्यायालयीन केस दाखल केल्यानंतर रु.१,००,०००/- बक्षीस दिले जाते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उरण ( जि. रायगड ) तालुक्यातील कोप्रोली प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदे व गैरसोयीसंदर्भात**

**(४८) ११७६९१ (२८-०७-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उरण (जि. रायगड) तालुक्यातील कोप्रोली प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टरांची, परिचारिकेची पदे अनेक वर्षापासून रिक्त आहेत तसेच ऑपरेशन विभाग, एक्स-रे, सोनोग्राफी मशिन आदि अत्यावश्यक सुविधा उपलब्ध नसणे व तडे गेलेल्या भिंती, छताची पडझड, पाण्याची टंचाई अशा अनेक गैरसोयी माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रुग्णालयाची दुरावस्था तातडीने दूर करण्यासंदर्भात व डॉक्टरांची व परिचारिकांची रिक्त पदे तातडीने भरण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१९-१२-२०१८) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.
कोप्राली प्राथमिक आरोग्य केंद्रात मंजूर पदा नूसार डॉक्टरांची २ पदे भरण्यात आली असून आरोग्य सेविकेचे ०१ पद, स्त्री परिचर ०१ पद व परिचर ०२ पदे अशी एकूण ०४ पदे रिक्त आहेत.

प्राथमिक आरोग्य केंद्राच्या निकषामध्ये एक्स-रे सोनाग्राफी मशिन सुविधा मंजूर नाहीत. प्राथमिक आरोग्य केंद्र कोप्रोलीच्या दुरुस्तीसाठी सन २०१७-१८ मध्ये रु ७.५० लक्षची प्रशासकिय मान्यता जिल्हा परिषदेने दिली असून पाणी टंचाई दूर करण्याकरीता सूमारे १२.३० लक्ष इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकिय मान्यता देण्याची कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावर सूरु आहे. तसेच उर्वरित रिक्त पदे भरणेबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद रायगड कार्यालयाकडून आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांचकडे माहिती सादर करण्यात आली असून ग्राम विकास विभागामार्फत जिल्हा परिषदेकडील वर्ग-३ व वर्ग-४ ची पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**मुंबईतील रक्तपेढ्यांमध्ये व ठाणे जिल्हा रुग्णालयात रक्ताचा तुटवडा निर्माण झाल्याबाबत**

**(४९) ११९३५८ (२३-०७-२०१८). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील रक्तपेढ्यांमध्ये दिवसाला २५० ते ३०० बाटल्यांची गरज असताना सध्या २५ ते ४० बाटल्या रक्त उपलब्ध आहे व ठाणे जिल्हा रुग्णालयात रक्ताच्या केवळ २२ पिशव्या शिल्लक असल्याने रक्ताचा तुटवडा निर्माण झाला असल्याची बाब एप्रिल २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रक्ताच्या तुटवड्यामुळे शस्त्रक्रिया पुढे ढकल्या जात असल्याचेही निदर्शनास आले , हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रक्ताचा तुटवडा भरून काढण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१७-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.
माहे एप्रिल, २०१८ या महिन्याचे मुंबई व ठाणे जिल्हा रुग्णालयाचे रक्तसंकलन खालीलप्रमाणे होते.

| नाव | एकूण रक्तसंकलन | वापरले गेलेले युनिट |
|---|---|---|
| मुंबई जिल्हा | १७९९८ | १४५८० |
| ठाणे जिल्हा रुग्णालय | ४७१ | २८९ |

(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उदभवत नाही.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) तालुक्यात अंगणवाडयात होत असलेला गैरकारभार

**(५०) १२५१८९ (२५-०७-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) तालुक्यातील शासन यंत्रणा व अंगणवाडयातील कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी नेमण्यात आलेल्या पर्यवेक्षिकाच्या निष्काळजीपणामूळे अंगणवाडयामध्ये गैरकारभार होत असल्याची बाब माहे मे,२०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी भागातील अंगणवाडया कधी सुरू असतात तर कधी बंद असल्यामुळे बालके व गरोदर मातांना पोषण आहार मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार बालके व गरोदर मातांना अंगणवाडयामध्ये नियमित पोषण आहार मिळण्याबाबत व जे कर्मचारी त्यांची जबाबदारी व्यवस्थित पार पाडत नाहीत त्यांचेवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणर आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.